युद्धामुळे बाटलीबंद पाणीही महागणार

■ नवी दिल्ली

उन्हाळ्यात बाटलीबंद पाण्याची मागणी वाढते. मात्र यंदा इराण युद्धामुळे ऐन उन्हाळ्यात भारतातील बाटलीबंद पाणी महागण्याची शक्यता आहे. कारण युद्धामुळे इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याने वाहतुकीच्या खर्चात वाढ झाली आहे. त्याचा परिणाम बाटलीबंद पाण्याशी संबंधित सर्व आवश्यक घटकांच्या किमती वाढणार आहेत.

भारतातील बाटलीबंद पाण्याची उलाढाल ५ अब्ज डॉलर एवढी आहे. त्यामुळे त्यांनी वितरकांसाठी प्रति बाटली १ रुपयांची वाढ केली आहे. ही दरवाढ सध्या ५ टक्के आहे. मात्र युद्ध लांबल्यास दरवाढ १० टक्क्यांपर्यंत होण्याची शक्यता आहे. बाटलीबंद पाणी उद्योगातील व्यावसायिकदारांच्या देशव्यापी संघटनेने ही माहिती दिली आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाल्याने प्लास्टिकच्या बाटल्या बनवण्यासाठी महत्त्वाचा घटक असलेल्या पॉलिमरचे दर वाढले आहेत. प्रति किलो ५० ते ७० टक्के दरवाढ झाली आहे.बाटल्यांना लावावयाच्या प्लास्टिक बुचांच्या दरातसुध्दा दुप्पटीने वाढ झाली आहे. भारतात उपलब्ध पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी हे दूषित असते. त्यामुळे बाटलीबंद पाणी ही आता भारतीयांची गरज बनली आहे, असे संशोधक सांगतात.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

देश विदेश

इथिओपियामध्ये भूस्खलनामुळे हाहाकार! ६४ जणांचा मृत्यू

■ अदिस अबाबा

इथिओपियामध्ये ७ दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरूच असून त्यामुळे गामो झोनमधील गाचो बाबा, कांबा आणि बोकेन जिल्ह्यांमध्ये पूर आला आहे. इथे झालेल्या भूस्खलनात ६४ जणांचा मृत्यू झाला असून १२५ जण बेपत्ता आहेत.

दक्षिण इथिओपिया प्रादेशिक राज्याच्या राज्यपालांनी या घटनेबाबत शोक व्यक्त केला. गामो झोनचे आपत्ती प्रतिसाद संचालक मेस्फिन मनुका म्हणाले की, मुसळधार पावसामुळे अनेक भागात भूस्खलन होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे आणि अनेक लोक

ढिगाऱ्याखाली दबले गेले. गामो भागात बेपत्ता झालेल्या लोकांची संख्या १२८ वर पोहोचली आहे. त्यामुळे बचाव आणि मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे आणि आतापर्यंत एका व्यक्तीला जिवंत बाहेर काढण्यात आले आहे. भूस्खलनामुळे दक्षिण इथिओपियामधील प्रमुख रस्ते बंद झाले आणि अनेक पूल पाण्याखाली गेले आहेत. गाचो बाबा जिल्ह्याचे संपर्क प्रमुख अबेबे अगेना म्हणाले की, बहुतेक मृतदेह चिखल आणि ढिगाऱ्याखाली गाडलेले आढळले आहेत. किती घरे आणि कुटुंबे बाधित झाली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. स्थानिक अधिकारी आणि बचाव पथके ढिगाऱ्यात अडकलेल्या लोकांचा शोध घेत आहेत. बेपत्ता झालेल्या लोकांची संख्या आणखी वाढू शकते.

टॅक्स रिफंडबाबतीत करदात्यांना हायकोर्टाचा दिलासा

■ मुंबई

जुन्या थकबाकीसाठी सेटलमेंट योजनेचा लाभ घेतलेल्या राज्यातील हजारो करदात्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. जर एखाद्या करदात्याने 'म्नेस्टी स्कीम' अंतर्गत थकबाकीचा निपटारा करण्यासाठी अर्ज केला असेल, तर सरकार त्यांचा जुना टॅक्स रिफंड नवीन मागणीविरुद्ध परस्पर वळता करू शकत नाही, असा निर्णय उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. 'प्रेसिडेंट ट्रेड अँड एक्झिम कॉर्पोरेशन' नावाच्या कंपनीच्या याचिकेवर न्या. कुलकर्णी व न्या. आरती साठे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. कंपनीचा २००७-०८ या वर्षाचा ३३.२९ लाख रुपयांचा रिफंड सरकारकडे प्रलंबित होता. याचदरम्यानच्या काळात सरकारने प्रलंबित कर विवादांसाठी 'महाराष्ट्र थकबाकी तडजोड योजना २०२३' जाहीर केली. त्या योजनेंतर्गत कंपनीने २००८-०९ व २००९-१० या वर्षांतील थकबाकीचा निपटारा करण्यासाठी अर्ज केला आणि नियमानुसार २० टक्क्यांची रक्कम भरली. मात्र, विक्रीकर विभागाने कंपनीचा २००७-०८ चा रिफंड थेट २००८-०९ च्या थकबाकीशी वळता केला व रिफंड देण्यास नकार दिला.

गोव्यात धबधब्याचे पाणी वळविल्याने शेती करपली

पणजी - सावरी-नेत्रावळी येथील धबधब्याचे पाणी वनखात्याने जलवाहिनीद्वारे वळवल्यामुळे स्थानिक शेती करपल्याचा आणि पाणीटंचाई निर्माण झाल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. या कृतीमुळे नेत्रावळीतील शेतकरी आक्रमक झाले. नैसर्गिक जलस्त्रोत वळविल्याने सावरी आणि मैनापी धबधब्याच्या नैसर्गिक अस्तित्वावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली.

खाजगी विद्यापीठांतील मुलींना शुल्कमाफी योजनेचा लाभ नाही

मंत्री चंद्रकांत पाटलांची माहिती

■ मुंबई

राज्यातील मुलींना मोफत शिक्षण मिळावे या उद्देशाने शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मात्र खाजगी व अभिमत विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना ही योजना लागू नाही, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली. याबाबत आमदार रईस शेख आणि राजेश क्षिरसागर यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

खाजगी व अभिमत विद्यापीठांमध्ये शिकणाऱ्या मुलींना या योजनेचा लाभ मिळत नाही हे खरे आहे का, पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा इतर शासकीय शिष्यवृत्ती घेतल्यास केवळ एका योजनेचा लाभ घेण्याची अट असल्यामुळे अनेक मुली शुल्कमाफीपासून वंचित राहत आहेत का ? असे प्रश्न आमदारांनी विचारले.

या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, ८ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित व अंशतः अनुदानित महाविद्यालये, कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतन, सार्वजनिक विद्यापीठे तसेच शासकीय अभिमत विद्यापीठांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या मुलींना शैक्षणिक व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के सवलतीस शासनाने मान्यता दिली आहे.

पत्रिकेतून भाजपा आमदारांची नावे वगळल्याने पालिकेत आंदोलन

■ वसई

प्रभाग समिती कार्यालयाच्या नवीन वास्तूच्या उद्घाटन पत्रिकेतून पालिकेने खासदारांसह दोन्ही आमदारांची नावे वगळल्याने भाजपा संतप्त झाली आहे. या प्रकरणी शुक्रवारी सकाळपासून भाजपाने पालिका मुख्यालयात ठिय्या आंदोलन करत आयुक्तांच्या दालनाला घेराव घातला. आयुक्त मनोजकुमार सुर्यवंशी यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात आली. दिवसभर हे आंदोलन सुरू होते.

वसई-विरार महापालिकेने प्रभाग समिती 'अ'ची नवीन इमारत तयार केली आहे. त्याचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी माजी आमदार क्षितिज ठाकूर यांच्या हस्ते आयोजित केला आहे. मात्र यासाठी तयार केलेल्या आमंत्रण पत्रिकेत आमदार स्नेहा दुबे पंडित, आमदार विलास तरे तसेच खासदार डॉ. हेमंत सवरा यांचे नाव वगळले आहे. ही पत्रिका मिळताच भाजपामध्ये संताप पसरला. शुक्रवारी सकाळी भाजपा कार्यकर्त्यांनी पालिका मुख्यालयात ठिय्या आंदोलन केले. नंतर आयुक्तांच्या दालनात शिरून भजन करत ठाण मांडले. आयुक्तांनी राजशिष्टाचाराचे उल्लंघन केले असून आयुक्तांना निलंबित करण्याची मागणी विरोधी पक्षनेते मनोज पाटील यांनी केली. या प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे पत्र अतिरिक्त आयुक्तांनी दिल्यानंतर हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. ही पालिकेची अधिकृत आमंत्रण पत्रिका नसल्याचा खुलासा रात्रीच आयुक्तांनी केला होता. भाजपाच्या वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहून अधिवेशनात आयुक्तांविरोधात हक्कभंग आणण्याची मागणी केली आहे.

भाजपाच्या आंदोलनानंतर आमंत्रण पत्रिकेतून नावे वगळल्याप्रकरणी पालिकेचे शहराभियंता आणि उपअभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

सलग तिसऱ्या दिवशी शेअर बाजार आपटला

मुंबई - भारतीय शेअर बाजारात आज सलग तिसऱ्या दिवशी मोठी घसरण पहायला मिळाली. दिवसभराच्या व्यवहाराअंती मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स तब्बल १४७०.५० अंकांनी कोसळला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी २३,२०० अंकांच्याही खाली गेला. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्ध लवकर संपणार नाही, असे संकेत मिळाल्याने गुंतवणुकदारांची चिंता वाढवली आहे. ग्राहकोपयोगी वस्तुंचे क्षेत्र वगळता निफ्टीच्या बाकी सर्व १५ प्रमुख क्षेत्रीय निर्देशांक घसरणीसह बंद झाले.

मुंबईत पालिका शाळांतील मध्यान्ह भोजनात फळवाटप

■ मुंबई

आखाती देशातील युद्धामुळे देशभरात गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाली आहे. या गॅसतुटवड्यामुळे मुंबई महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन पोषण आहार देणे शक्य होत नसल्याने केळी, सफरचंद अशी फळे देण्यात येत आहेत, अशी माहिती पालिकेच्या शिक्षण समिती अध्यक्ष राजश्री शिरवडकर यांनी दिली. सध्या पालिकेच्या शाळांतील ५.४० लाख विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाला मुकावे लागले आहे. सिलिंडर तुटवडा निर्माण झाल्याने पालिका मुख्यालयातील उपाहारगृहातील जेवणातही कपात केली आहे. महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये पालिका प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारावर गॅस सिलिंडर टंचाईचे संकट ओढावले आहे. गॅस पुरवठा कंपन्यांनी सेवाभावी संस्थांना व्यावसायिक गटात धरून एलपीजी सिलिंडर देण्यास मनाई केल्याने भोजनावर परिणाम होण्याची भीती प्राथमिक शिक्षण संचालकांना लिहिलेल्या तातडीच्या पत्रात व्यक्त केली आहे.

मुंबईत पुस्तक प्रदर्शनात मराठी पुस्तके नाहीत

उबाठा आक्रमक

■ मुंबई

लोअर परळ येथील फिनिक्स मॉलमध्ये सुरू असलेल्या पुस्तक प्रदर्शनात एकही मराठी पुस्तक नसल्याचा आरोप करत उबाठाने आक्रमक भूमिका घेतली. मराठी भाषेला डावलल्याचा आरोप करत स्थानिक नगरसेविका अबोली खाडे आणि शिवसैनिकांनी प्रदर्शनाला भेट देत आयोजकांना जाब विचारला.

लोअर परळ येथील फिनिक्स मॉलमध्ये गेल्या चार दिवसांपासून पुस्तक प्रदर्शन सुरु आहे. मात्र या प्रदर्शनात मराठी भाषेतील एकही पुस्तक नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला. मराठी भाषेला दुय्यम स्थान दिल्याचा आरोप करत शिवसैनिकांनी प्रदर्शनातील काही स्टॉल उधळून लावत आयोजकांना मराठी पुस्तकांना स्थान देण्याची मागणी केली. स्थानिक नगरसेविका अबोली खाडे यांनीही आयोजकांकडे याबाबत जाब विचारत मुंबईत होणाऱ्या प्रदर्शनात मराठी पुस्तकांचा समावेश असणे आवश्यक असल्याचे सांगितले. दरम्यान, या प्रकारामुळे फिनिक्स मॉल परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

बाबा सिद्दिकी हत्या खटला भंगार व्यावसायिक कालीला

कोर्टाने जामीन नाकारला

■ मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते, माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी आरोपी भंगार व्यावसायिक भगवान सिंह ऊर्फ काली याचा जामीन अर्ज विशेष मकोका न्यायालयाने फेटाळला. साक्षीदारांचे कबुलीजबाब आणि कॉल डिटेल्स रेकॉर्डवरून (सीडीआर) हल्लेखोरांना शस्त्रास्त्र पुरवण्यात कालीचा सहभाग असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते, असे निरीक्षण न्यायालयाने कालीचा जामीन अर्ज नाकारताना नोंदवले.

बचाव पक्षाचे वकील सचिन झाल्टे-पाटील यांनी कालीचा अन्य संशयित आरोपी राम कनोजिया याच्याशी मोबाईलवरून झालेला संवाद हा व्यवसायाशी संबंधित होता. तसेच कनोजिया याने दिलेला कबुलीजबाब विश्वास ठेवण्याजोगा नाही, असा युक्तिवाद केला. विशेष सरकारी वकील महेश मुळे यांनी झाल्टे-पाटील यांच्या म्हणण्याला विरोध केला. राजस्थानमध्ये जेव्हा शस्त्रांची देवाण-घेवाण झाली त्यावेळचे कालीचे मोबाईल लोकेशन आणि अन्य आरोपींचे मोबाईल लोकेशन समान होते, असे तपासातून आढळून आले आहे.

फॉर्म ए - जाहीर घोषणा
(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)

आयटीएमसी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता
संबंधित तपशिल

१	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	**आयटीएमसी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड**
२	कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख	३१ जानेवारी २०१७
३	ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे	आरओसी - मुंबई
४	कॉर्पोरेट ओळख क्र.	U70109MH2017PTC290015
५	कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता	१, रामकृपा इमारत, देवजी भीमजी लेन, मधुदास रोड, कांदिवली (प), मुंबई - ४०००६७
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख	११ मार्च २०२६
७.	दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख	०७ सप्टेंबर २०२६
८.	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	नाव: स्ट्रेस क्रेडिट रिझोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड नोंदणी क्रमांक: IBBI/IPE-0094/IPA-3/2023-24/50059
९.	बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल	स्ट्रेस क्रेडिट रिझोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड बी १३०५/६, दोस्ती एलिट, रोड क्र. २९, सायन, मुंबई, महाराष्ट्र ४०००२२ ईमेल आयडी: admin@stresscredit.com
१०.	अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल	स्ट्रेस क्रेडिट रिझोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड बी-८०७, ईस्ट पॉइंट, पंत नगर, ९० फूट रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ७५ ईमेल आयडी: itmc.cirp@gmail.com
११.	दावा सादर करण्याची अंतिम तारीख	२५ मार्च २०२६
१२.	कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग	होय
१३.	वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	१. श्री. प्रसाद वारकर २. श्री. विकास खियानी ३. श्री. दिनेश देवरा
१४.	(अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत:	वेब लिंक: https://ibbi.gov.in/en/home/downloads आयआरपी यांच्याकडे विनंती: itmc.cirp@gmail.com

याद्वारे सूचना देण्यात येते की राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई यांनी दि. **११ मार्च २०२६** रोजी आयटीएमसी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.
आयटीएमसी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना येथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यांसह २५ मार्च २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत.
वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.
पुष्टी क्र.१२ विरुद्ध सूचीबद्ध केलेल्या वर्गातील वित्तीय धनको, फॉर्म सीए मध्ये पुष्टी क्र.१३ विरुद्ध सूचीबद्ध केलेल्या तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधीची निवड दर्शवेल जे वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी (वर्ग निर्दिष्ट करा) म्हणून काम करतील.
दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

दिनांक: १४ मार्च २०२६ **सही/-**
ठिकाण: मुंबई **स्ट्रेस क्रेडिट रिझोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेडकरिता**
अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल आयटीएमसी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणी क्र.: IBBIIPE-0094/IPA-3/2023-24/50059
एएफए वैधता दिनांक: ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत

नेपच्यून व्हेंचर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
परिसमापकाचे कार्यालय: स्ट्रेस क्रेडीट रिझॉल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, ८०७, बी विंग, ईस्ट पॉईंट, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०००२२. ई-मेल: nvdpl.liq@gmail.com, दूर. क्र./मोबाईल क्र.: १८३३०२३०५०

आयबीसी, २०१६ अंतर्गत मालमत्तांच्या विक्रीकरिता ई-लिलावासाठी सूचना
आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन २२ आणि ३३ सह वाचावयाच्या आयबीसी, २०१६ च्या कलम ३५(एफ) अन्वये परिसमापन संपत्तीचा भाग असणाऱ्या, नेपच्यून व्हेंचर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या मालकीच्या संपत्तीची विक्री **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" तत्त्वावर** करण्यात येणार आहे.
संपत्तीचे मूलभूत वर्णन:

मालमत्तेचा प्रकार	तपशील/ठिकाण/पत्ता/क्षेत्र	राखीव किंमत (आयएनआर)	ईएमडी (आयएनआर)	विस्तारयोग्य बोली (आयएनआर)
प्लान्ट आणि मशिनरी	युनिट ४०१, ईस्टर्न बिझनेस डिस्ट्रिक्ट, भांडुप, मुंबई येथे असलेल्या सीपीयू, एसी युनिट्स, फर्निचर, लाकडी फर्निचर, कार्यालयीन खुर्च्या, सोफा सेट, काचेचे टेबल, बेड, टीव्ही, लॅपटॉप आणि डेस्कटॉप, इलेक्ट्रॉनिक व्हाईटबोर्ड, पेपर श्रेडर, प्रिंटर, फ्रिज आणि इतर विविध वस्तू समाविष्ट असलेले प्लान्ट आणि मशिनरी	रु. २,७५,०००/- (रुपये दोन लाख पंचाहत्तर हजार मात्र)	रु. २७,५००/- (रुपये सत्तावीस हजार पाचशे मात्र)	रु. १०,०००/- (रुपये दहा हजार मात्र)

साईटला भेट/पाहणीकरिता कालावधी	सोमवार, ३०.०३.२०२६ ते सोमवार, ०६.०४.२०२६
बोली दस्तऐवज सादर करणे आणि ईएमडी जमा करण्याकरिता अंतिम दिनांक	सोमवार, ०६.०४.२०२६ पर्यंत सायं. ०७.०० वाजेपर्यंत
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ:	**गुरुवार, ०९.०४.२०२६ रोजी स. ११.३० ते दु. १.३०** (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

टीपा:
१. संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेच्या उद्घोषणेसह आवश्यक दस्तऐवज इलेक्ट्रॉनिक लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे सादर करावे.
२. संभाव्य बोलीदारांनी इसारा रक्कम अनामत (ईएमडी) बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जमा करावी. जर बोलीदार अपात्र आढळल्यास, ईएमडी जप्त करण्यात येईल.
३. कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता, www.ibbi.gov.in वर उपलब्ध असलेले नियमित विचारण्यात येणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि मार्गदर्शक दस्तऐवज पहावे. तसेच, तुम्ही दूर. क्र.: +९१ ८२९१२२०२२० किंवा ईमेल आयडी: support.baanknet@psballiance.com वर संपर्क करू शकता.
४. ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती आणि कॉर्पोरेट ऋणकोच्या संपत्तीचे तपशील वेबसाईट म्हणजेच https://ibbi.baanknet.com वर अपलोड केलेल्या किंवा nvdpl.liq@gmail.com वर ईमेलद्वारे विनंती पाठवून प्राप्त करता येणाऱ्या **'ई-लिलाव प्रक्रिया ज्ञापन'** मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.
दूर. क्र. / मोबाईल क्र.: १८३३०२३०५०.

सही/-
स्ट्रेस क्रेडीट रिझॉल्यूशन प्रायव्हेट लिमिटेडकरिता आणि त्यांच्या वतीने
नोंद. क्र. IBBI/IPE-0094/IPA-3/2023-24/50059
नेपच्यून व्हेंचर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
एएफए वैधता दि. ३१.१२.२०२६ पर्यंत
ठिकाण: मुंबई
दिनांक: १४.०३.२०२६

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनामध्ये)
नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, डिव्हाईन चाईल्ड हायस्कूलसमोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३. सीआयएन: L99999MH1992PLC066213
(माननीय एनसीएलटीच्या आदेश दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ नुसार परिसमापनअंतर्गत कंपनी)

ई-लिलावाकरिता जाहीर उद्घोषणा
नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ आणि विनियमनांअंतर्गत सूचना
निम्नस्वाक्षरीकारांद्वारे तमाम जनतेस याद्वारे ई-लिलावाची सूचना देण्यात येते की, नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ ("**आयबीसी**") च्या तरतुदी सहवाचिता त्याअंतर्गत बनविलेले नियम आणि विनियमनांनुसार कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या **जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनामध्ये)** ("**कॉर्पोरेट ऋणको**") च्या मालकीच्या ९ मालमत्ता गटांच्या (खालील तक्त्यामध्ये वर्णन केलेल्या) 'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे', 'जसे आहे तसेच आहे', 'तेथे जे आहे', 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर', कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा ऋणसानभरपाईशिवाय विक्रीकरिता बोली आमंत्रित करण्यात येत आहेत.
विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे इतर बाबींसोबतच आयबीबीआय (विनियमन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ आणि बँकनेट येथे या लिंकवर उपलब्ध असलेल्या मालमत्ता विक्री प्रक्रिया ज्ञापनपत्र दिनांक १४ मार्च, २०२६ ("**एएसपीएम**") नुसार ई-लिलाव प्लॅटफॉर्म **बँकनेट** (पूर्वीचा ईबीक्रय) **https://ibbi.baanknet.com** ("**ई-लिलाव प्लॅटफॉर्म**") द्वारे करण्यात येईल

ई-लिलावाच्या महत्त्वाच्या दिनांकांचे वेळापत्रक

पात्रता दस्तऐवज आणि कलम २९ए हमी सादर करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ	**दि. १३ एप्रिल, २०२६, सायं. ५.००**
इसारा रक्कम अनामत ("**ईएमडी**") जमा करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ	**दि. १३ एप्रिल, २०२६, सायं. ६.००**
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ	**दि. १६ एप्रिल, २०२६, स. ९.०० ते रात्री ८.००**
अंतिम विक्री मोबदला भरणा करण्याचा अंतिम दिनांक	निम्नस्वाक्षरीकारांद्वारे अंतिम विक्री मोबदला भरणा करण्याकरिता मागणी पत्र पारित केल्यापासून साठ (६०) दिवसांमध्ये

अ. क्र.	मालमत्तेचे वर्णन	लिलाव आयडी	राखीव किंमत* (भारतीय रु.मध्ये)	इसारा रक्कम अनामत (भारतीय रु.मध्ये)	विस्तारयोग्य मूल्य (भारतीय रु.मध्ये)
१	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेन्ट - ग्राऊंड पॉवर युनिट, एअर कंडिशनिंग युनिट, हायड्रोलिक जॅक मालमत्ता आयडी: ३८०४	३०८४	१,३०,२१,९००	१३,०२,१९०	६,५०,०००
२	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेन्ट - बॅगेज ट्रॉलीज, कार्गो ट्रॉलीज मालमत्ता आयडी: ३८०५	३०८५	८,४५,६२५	८४,५६२	४०,०००
३	ग्राऊंड सपोर्ट वाहने - महिंद्रा बोलेरो, मारुती ईको आणि मारुती व्हॅन मालमत्ता आयडी: ३८०६	३०८६	४१,४७,२२५	४,१४,७२२	२,००,०००
४	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेन्ट - टोयोटा टोईंग ट्रॅक्टर आणि फोर्कलिफ्ट्स मालमत्ता आयडी: ३८०८	३०८७	१,२२,९०,४००	१२,२९,०४०	६,००,०००
५	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेन्ट - टी १३५ इलेक्ट्रीकल टोईंग ट्रॅक्टर मालमत्ता आयडी: ३८०९	३०८८	१,३०,९४,८७५	१३,०९,४८७	६,५०,०००
६	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेन्ट - बॅगेज ट्रॉलीज, कार्गो ट्रॉलीज मालमत्ता आयडी: ३८१०	३०८९	३८,४५,३२५	३,८४,५३२	१,५०,०००
७	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेन्ट - अग्निशामक यंत्रे आणि ट्रॉलीज मालमत्ता आयडी: ३८११	३०९०	६७,५१५	६,७५१	३,०००
८	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेन्ट - वायर्किंग ट्रॉलीज, व्हील रॅक ट्रॉलीज मालमत्ता आयडी: ३८१२	३०९१	२,६७,४२५	२६,७४२	१३,०००
९	ग्राऊंड सपोर्ट इक्विपमेन्ट - टोयोटा टो टग मालमत्ता आयडी: ३८१३	३०९२	१७,३८,८७५	१,७३,८८७	८५,०००

ठिकाण: जेट एअरवेज हँगर, आयजीआय एअरपोर्ट, नवी दिल्ली - ११००३७

*इतर गोष्टींबरोबरच कर, आकारणी, प्रभार, शुल्क, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठी लागू असलेले सर्व आवश्यक खर्च वगळता. निम्न स्वाक्षरीकारांकडून कोणतेही प्रतिनिधित्वे, हमी आणि ऋणसानभरपाई दिली जाणार नाही.

महत्त्वाच्या टिपा:
१. ई-लिलाव वरील सूचिबद्ध ९ मालमत्ता गटांकरिता ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.
२. ही विक्री सूचना बँकनेट येथे या **लिंक** वर उपलब्ध असलेल्या, मालमत्तेची माहिती, घोषणापत्र, प्रतिज्ञापत्र आणि आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्र आणि 'ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी आणि शर्ती' समाविष्ट असलेल्या संबंधित एएसपीएमसह वाचावी.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता दस्तऐवज आणि ईएमडी ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निर्धारित वेळमर्यादेमध्ये सादर करावेत.
४. संभाव्य बोलीदारांनी त्यांना आयबीसीच्या कलम २९अ अंतर्गत लागू असलेल्या मर्यादेपर्यंत कोणतीही अपात्रता नाही असे हमीपत्र सादर करावी आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, त्यांनी सादर केलेली ईएमडी जप्त करण्यात येईल.
५. ई-लिलावासंबंधी कोणत्याही प्रश्नासाठी कृपया परिसमापकांचे अधिकृत प्रतिनिधी, श्री. श्लोक नंदनपवार (+९१-८२०८५०३६९३) यांना "जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड: मालमत्ता विक्री - जीएसई दिल्ली" या विषयासह **jetliquidation@in.ey.com** आणि **liquidation.jet@gmail.com** वर संपर्क साधावा.
६. हे स्पष्ट करण्यात येते की, ही सूचना विक्री करण्यासाठी निम्नस्वाक्षरीकारांकडून किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापक) कडून कोणत्याही प्रकारचे बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. निम्नस्वाक्षरीकारांनी घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.
७. असे स्पष्ट करण्